|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**



## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१९ /आ.अ.व वि.वि./**कार्यशाळा/ ०९** /२०२३ ई.पत्र दि. ०१/०२/२०२३

**प्रति,**

**विद्यापीठ परिक्षेत्रातील,**

**कला, वाणिज्य, विज्ञान व समाजकार्य महाविद्यालयाचे मा.प्राचार्य/संचालक/विभाग प्रमुख यांना,**

**विषय :- ‘ लिंगभाव संवेदनशीलता ’ ( लिंगभाव, मर्दानगी आणि सत्ता व आंतरसंबंध ) या विषयावर आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेत सहभागासाठी दोन विद्यार्थ्यांची नावे पाठविणेबाबत.**

**महोदय/महोदया,**

विद्यापीठ हे समाजातील शिक्षण-प्रशिक्षणाचे प्रमुख केंद्र आहे. औपचारीक अशा पदवी/पदव्यूत्तर अभ्यासक्रमांच्या माध्यमातुन विद्यार्थी वर्गाला शिक्षित व सक्षम बनवण्याचे कार्य विद्यापीठ करतच असते. शिक्षणाबरोबरीनेच इतर सामाजिकदृष्टया महत्वाचे पूरक कार्यक्रम करुन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीचे भान व जाणिव निर्माण करणे अत्यावश्यक असते. अशा पूरक कार्यक्रमांच्या आयोजनात सहभाग घेऊन, सामिल होऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यास हातभार लागत असतो. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाकडे वेळोवेळी विद्यापीठ परीक्षेत्रातील विविध महाविद्यालय व मान्यता प्राप्त संस्थांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरीक, विद्यार्थी व समाजातील विविध घटकांसाठी ऑफलाईन व ऑनलाईन पध्दतीने विविध विस्तारीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते.

स्त्री-पुरुष समानता आणि स्त्री पुरुषांचे निकोप सहजीवन याबाबत आजच्या युवापिढीला सजग भान प्राप्त करुन देणे, ही काळाची गरज आहे. आज आपल्या आजूबाजूला सातत्याने घडणाऱ्या स्त्री अत्याचाराच्या घटना लक्षात घेता याबाबत युवक-युवतींच्या मानसिक व वैचारिक जडणघडणीकडे विशेष लक्ष पुरविणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मुंबई येथील ‘ मावा ’ ( MAVA -Men Against Viloence & Abuse ) संस्था व आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात ‘ लिंगभाव संवेदनशीलता ’ ( लिंगभाव, मर्दानगी आणि सत्ता व आंतरसंबंध ) या विषयावर या विषयातील तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली दोन दिवसांच्या कार्यशाळेचे आयोजन दि.०२ व ०३ मार्च २०२३ रोजी सकाळी १०.०० ते सायं.०६.०० वाजेपर्यत विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येईल, कार्यशाळे दरम्यान उपस्थितांसाठी निःशुल्क किट उपलब्ध करुन देण्यात येणार असून चहा, नाश्ता व भोजन व निवासाची व्यवस्था निःशुल्क करण्यात आली आहे. सदर कार्यशाळेसाठी विद्यापीठ परिक्षेत्रातील कला, वाणिज्य, विज्ञान व समाजकार्य महाविद्यालयातील एकूण साठ (तीस मुले व तीस मुली ) विद्यार्थ्याचा सहभाग असेल. कार्यशाळेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालय ते विद्यापीठ व परत महाविद्यालय असा प्रवास खर्च महाविद्यालयाने आपल्या स्तरावर करावा.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात शिकत असलेल्या व शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रवेशित व नियमित असलेल्या एक विद्यार्थी एक विद्यार्थिनी यांची नावे सोबत जोडलेल्या नमुन्यात प्राचार्याच्या लेटरहेडवर उपरोक्त कार्यशाळेसाठी या विभागास **दि.१५ फेब्रुवारी २०२३ पर्यत संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यत** directorllleb@nmu.ac.in **या ई.पत्यावर पाठवावी.** ( कृपया हार्ड कॉपी पाठवू नये )

कळावे!

**आपला विश्वासू,**

**(प्रा.डॉ.आशुतोष र.पाटील)**
**संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग**

**सोबतः-** विद्यार्थ्यांची नावे पाठविण्याच्या नमुना

**Phone-0257-2257415/416**
**FAX-0257-2258403-406**

**वेबसाईट-nmu.ac.in**
**ई.मेल-** directorllleb@nmu.ac.in

**दि.    /    /**

**मा.संचालक,**
**आजीवन अध्ययन व विस्तार विभाग,**
**कबचौउमवि,**
**जळगाव**

**विषय:- ‘ लिंगभाव संवेदनशीलता या कार्यशाळेसाठी दोन विद्यार्थ्यांची नावे पाठविणेबाबत.**
**संदर्भ :- विद्यापीठ पत्र जा.क्र.कबचौउमवि/१९/आ.अ.व.वि.वि./कार्यशाळा/      २०२३, दि.    /    /**

महोदय,

वरील संदर्भीय पत्रानुसार आमच्या महाविद्यालयातील खालील नमूद केलेले दोन विद्यार्थी कार्यशाळेत सहभागी होत आहेत.

| अ.क्र. | विद्यार्थी/विद्यार्थिनीचे नाव | प्रवेशित वर्ग | भ्रमणध्वनी/व्हाट्सअप क्रमांक | ई.मेल पत्ता |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

उपरोक्त दोन विद्यार्थ्यांना कार्यशाळेत सहभागी करुन घ्यावे ही, विनंती.

कळावे.

आपला विश्वासू

प्राचार्य

शिक्का